खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२५ – २६

### मराठी विभाग : मराठी भाषा गौरव दिन

सकाळ

## मराठी भाषेद्वारे रोजगाराच्याही संधी उपलब्ध

### राजगुरू महाविद्यालयात मराठी भाषा गौरवदिनी डॉ. शिरीष पिंगळे यांचे प्रतिपादन

राजगुरुनगर, ता. २७ : ''मराठी साहित्याचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांकडे कल्पकता आणि भाषेचा अचूक वापर करण्याचे कौशल्य असल्याने ते पटकथा लेखन, जाहिरात लेखन, पत्रकारिता या क्षेत्रात जाऊ शकतात. त्यांना अशा विविध रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत,'' असे प्रतिपादन हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या वतीने आयोजित मराठी भाषा गौरव दिनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. या प्रसंगी उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे, प्रा. स्मिता कोळेकर, डॉ. बाळासाहेब अनुसे, डॉ. दिलीप मुळूक, प्रा. किशोर लांडे-पाटील, डॉ. डी. एम. मारकड, डॉ. प्रभाकर जगताप, प्रा. हेमलता चौधरी, प्रा. ओंकार टाकळकर आदी उपस्थित होते.



राजगुरुनगर : मराठी भाषादिनानिमित्त 'संत साहित्य आणि मराठी भाषा' या विषयावर मनोगत व्यक्त करणारी साक्षी शिवेकर हिचा सन्मान करताना उपस्थित.

या वेळी डॉ. संजय शिंदे यांनी कवी कुसुमाग्रजांच्या साहित्यिक योगदानाचा आढावा घेतला. प्रा. पार्थ खाडीलकर यांनी थॉमस कँडी यांचे मराठी भाषेसाठीचे योगदान या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. साक्षी शिवेकर या विद्यार्थिनीने संत साहित्य आणि मराठी भाषा या विषयावर मनोगत व्यक्त केले. प्राची बोत्रे, गायत्री देशमुख, ओंकार बोटकुळे, सारंग शिंदे या विद्यार्थ्यांनी अनुवादित पुस्तकांचा परिचय करून दिला. या वेळी प्रा. खाडीलकर यांनी मराठी भाषा प्रतिज्ञेचे वाचन केले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. शिंदे यांनी केले, तर आभार प्रा. डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी मानले.

Pune, District-Today
28/02/2026 Page No. 5

पुढारी

# लेखनकौशल्यातून रोजगाराच्या संधी उपलब्ध : डॉ. शिरीष पिंगळे

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

मराठी भाषा आणि साहित्याचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांकडे कल्पकता आणि भाषेचा अचूक वापर करण्याचे कौशल्ये असेल तर पटकथालेखन, जाहिरातलेखन, पत्रकारिता, या क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने कवी कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनानिमित्त आयोजित मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रमात डॉ. पिंगळे बोलत होते.

**■ राजगुरू महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन**

या प्रसंगी उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे, प्रा. स्मिता कोळेकर, डॉ. बाळासाहेब अनुसे, डॉ. दिलीप मुळूक, प्रा. किशोर लांडे-पाटील, डॉ. डी. एम. मारकड, डॉ. प्रभाकर जगताप, प्रा. हेमलता चौधरी, प्रा. ओंकार टाकळकर उपस्थित होते.

डॉ. संजय शिंदे यांनी कवी कुसुमाग्रजांच्या साहित्यिक योगदानाचा आढावा घेतला. प्रा. पार्थ खाडीलकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. साक्षी शिवेकर या विद्यार्थिनीने संत साहित्य आणि मराठी भाषा या विषयावर मनोगत व्यक्त केले. प्राची बोत्रे, गायत्री देशमुख, ओंकार बोटकुळे, सारंग शिंदे या विद्यार्थ्यांनी अनुवादित पुस्तकांचा परिचय करून दिला.



**साक्षी शिवेकर हिचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे.**

My Pune Gramin Edition
Mar 02, 2026 Page No. 8
Powered by: erelego.com

दैनिक आरंभपर्व
02 Mar 2026 - Page 4

# लेखन कौशल्यातून रोजगाराच्या संधी उपलब्ध - डॉ. शिरीष पिंगळे

## राजगुरू महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात



**राजगुरुनगर-किरण खुडे**
**(दै. आरंभ पर्व)**

मराठी भाषा आणि साहित्याचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांकडे कल्पकता आणि भाषेचा अचूक वापर करण्याचे कौशल्ये असेल तर पटकथा लेखन, जाहिरात लेखन, पत्रकारिता या क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी केले. ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने कवी कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनानिमित्त आयोजित मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रमात बोलत होते. या प्रसंगी उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे, प्रा. स्मिता कोळेकर, डॉ. बाळासाहेब अनुसे, डॉ. दिलीप मुळूक, प्रा. किशोर लांडेपाटील, डॉ. डी. एम.मारकड, डॉ. प्रभाकर जगताप, प्रा. हेमलता चौधरी, प्रा. ओंकार टाकळकर उपस्थित होते.

कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी अभिवादन केले. ते पुढे म्हणाले की, मराठी भाषा गौरव दिन म्हणजे मराठी समाजाच्या, संस्कृतीचा गौरव असून प्रत्येक मराठी जनाला मराठीपणाचा अभिमान वाटला पाहिजे. विद्यार्थ्यांनी वाचन, लेखन, श्रवण, भाषण, संभाषण अशी भाषिक कौशल्य आत्मसात करून आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करावा असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. संजय शिंदे यांनी कवी कुसुमाग्रजांच्या साहित्यिक योगदानाचा आढावा घेतला.आजचा दिवस आपल्या मायबोलीचा सन्मान करण्याचा आणि समृद्ध वाटचालीला उजाळा देण्याचा असल्याचे त्यांनी सांगितले. प्रा. पार्थ खाडीलकर यांनी थॉमस कँडी यांचे मराठी भाषेला योगदान या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. थॉमस कँडी यांनी स्वल्पविराम, अर्धविराम, पूर्णविराम, प्रश्नचिन्ह आणि उद्गारचिन्ह अशा पाच विरामचिन्हांच्या माध्यमातून मराठी भाषेला सौंदर्य प्राप्त करून दिल्याचे त्यांनी सांगितले.

साक्षी शिवेकर या विद्यार्थिनीने संत साहित्य आणि मराठी भाषा या विषयावर मनोगत व्यक्त केले. प्राची बोत्रे, गायत्री देशमुख, ओंकार बोटकुळे, सारंग शिंदे या विद्यार्थ्यांनी अनुवादित पुस्तकांचा परिचय करून दिला. या वेळी प्रा. पार्थ खाडीलकर यांनी मराठी भाषा प्रतिज्ञेचे वाचन केले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे तर आभार प्रा. डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी मानले.



**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**